# Sahaj Adhyayan (सहज अध्ययन)

**जर हे Practice Question Papers तुम्हाला खरंच फायदेशीर वाटत असतील तर तुमच्या सर्व मित्र मैत्रिणींना पाठवा.**

**त्यांना देखील ह्या सर्वांचा अभ्यासासाठी फायदा होऊ द्या.**

For more study material connect with us on

**Instagram**: www.instagram.com/sahajadhyayan

**YouTube (मराठी माध्यम):** www.youtube.com/sahajadhyayan

**YouTube (Semi/English):**

www.youtube.com/SahajAdhyayanSemiEnglish

**Telegram** (for PDF): t.me/sahajadhyayan

**Facebook**: www.facebook.com/sahajadhyayan

**WhatsApp** (only Message, No calls): **855 289 2890**

For more study material register here
www.sahajadhyayan.in/register

**जर तुमच्या जवळ कोणत्याही इयत्तेच्या, कोणत्याही परीक्षेच्या, कोणत्याही विषयाचे, Question Papers असतील**

**तर ते आम्हाला WhatsApp वर पाठवा,**

**इतर विद्यार्थी मित्रांना त्या सर्वांचा उपयोग होईल.**

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

This Question paper shared by Prafull from Ahmednagar, Thanks Prafull.

# प्रथम सत्र परीक्षा सन २०२१-२२

इयत्ता : ११ वी | गुण: ५०

विषय :- मराठी | वेळ : २.३० तास

## (गद्य विभाग)

**कृती १अ) खाली दिलेल्या उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ८

१) लेखकाने विद्यार्थ्यांचे वर्णन करण्यासाठी वापरलेले शब्द → [ ] , [ ] २

२) मामूची शालाबाह्य रुपे → [ ] , [ ] २

रांगा धरुन उभे राहिलेले अनघड, कोवळे कंठ जोडल्या हातांनी आणि मिटल्या डोळ्यांनी भावपूर्ण सुरात प्रार्थनेतुन अज्ञात शक्तीला आळवू लागातात.

मामू एका दगडी खांबाला रेलून आपली चुनेवाणाची सफेद दाढी कुरवाळत ती समूह प्रार्थना ऐकत राहतो. त्याच मन कशात तरी गुंतून पडतं.

प्रार्थना संपते. 'जनगणमन' ची ईशारत मिळते. खांबला रेललेला मामु पाय जोडून सावधानचा पवित्रा घेऊन खडा होतो.

या शाळेचा मामु एक अवयव झालाय. गेली चाळीस वर्ष तो आपल्या अलिबाबाच्या हातानं घंटेचे टोल देत, अशे चैतन्याचे कोंब नाचवत अलाय. कोल्हापुर संस्थान होतं तेव्हा राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील मामुची नेमणुक आहे. त्यानं दोन राज्य बघितली संस्थानच आणि लोकशाहीच. कोल्हापुरकरांच्या कैक पिढ्या बघितल्या.

मामुच्या सफेद दाढीत जेवढे केस आहते तेवढ्या त्याच्या आठवणी असतील! खुप बघितलय आणि बघितलय त्यानं. महाराजांच्या मुक्काम पन्हाळ्यावर पडला तर मामुला भल्या पहाटे उठून साथीदारांसह चौद मैलाची पायपीठ करावी लागली; पण ही आठवण



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan

सांगतांना कुठ वेदनेची कळ त्याच्या दाढीधारी चर्येवर तरळत नाही. उलट एका सच्चा सेवकाला शोभेल अशी अभिमानाची झालर त्याच्या मुकड्यावर उतरते. डोळे किलकिले करत, भुवया आक्रसून त्याच्या बुड्या देहातील उमंद मन बोलून जात', सर, फाटेचं धुक्यातनं पन्हाळ्यावर चढनं लय गमतीच. आता वाटत पर न्हाई झेपत.'

संस्थानं विलीन झाली आणि असा इमानी चाकरवर्ग चव्हाटा पांगला. त्यातच मामु या शाळेत रुजु झाला. एक शिपाई म्हणून.

डुईला अबोली रंगाचा फेटा, अंगात नेहरु शर्टावर गर्द निळ जाकिट, जाकिटाच्या खिशात चांदीच्या साखळीच एक जुन पॉकेट वॉच, खाली घेराची आणि घोट्याजवळ चुण्या असलेली तुमान, पायात जुनापूराना पंपशू हा मामूचा पोशाख आहे.

शाळेत तो शिपाई आहे ; पण शाळेबाहेर तो बहुरुपी आहे. कुठं फळांच्या मार्केटमध्ये एखाद्या बागवानाच्या दुकानावर घटकाभर बसून त्याचं दुकान चालव, तो हातावर ठेवेल ते अल्लाहची खैर म्हणून आपलंसं कर ; कुठ एखाद्या मुस्लिम अधिकाऱ्याच्या बच्चा बच्चीला उर्दूची शिकवन दे. एक ना दोन नाना तऱ्हेचे उद्योग मामू करतो.

शाळेतील लोकांना तो शिपाई वाटतो. शाळेबाहेरच्या लोकांना त्याचे अनेक रुपं दिसतात. मौलवी, व्यापरी, उस्ताद या सगळ्यांचा अंतर्भावर करता येईल असं साऱ्यांनी त्याला सुटसुटीत नाव देऊन टाकलंय – मामू!

**स्वमत: -**

**३) 'शाळेत तो शिपाई आहे पण शाळेबाहेर तो बहुरुपी आहे' : या मामुसंबंधी केलेल्या विधानाचा अर्थ पाठाच्या आधारे तुमच्या शब्दात लिहा.** ४

**किंवा**

**मामूच्या व्यक्तिमत्वाचे (राहणीमान, रुप) चित्रण तुमच्या शब्दात करा.**

**ब) उताऱ्याच्या आधारे सुचनानुसार कृती करा.**

**१) आकृत्या पूर्ण करा.** ४

जीवनातील पुस्तकांचे योगदान ↓ [ ] [ ] २

उत्तम साहित्यकृतीची वैशिष्ट्ये ↓ [ ] [ ] २



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Prafull from Ahmednagar, Thanks Prafull.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

माझी पुस्तकं हीच माझी अपत्यं. वाचायला भरपूर ग्रंथ असले तरी मी जन्मठेपेची शिक्षासुद्धा आनंदानं सहन करीन; पण पुस्तकं नसतील तर राजवाडासुद्धा मला स्मशानासारखा वाटेल.'' सहज माझ्या मनात विचार आला–असे निष्ठावंत वाचक आता दुर्मीळ झाले.

परवा मी बी.ए.च्या वर्गातल्या वाङ्मय विषयाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला, ''जी.ए.कुलकर्ण्यांच्या एखादा कथासंग्रह तुम्ही वाचला आहे काय ? संग्रह जाऊद्या, या लेखकाची एखादी कथा तरी तुमच्या वाचनात आली आहे काय ?'' साहित्य या विषयाचे रसिक विद्यार्थी – विद्यार्थिनी माना खाली घालून बसले होते. कदाचित जी.ए.कुलकर्णी हे नावसुद्धा त्यांना फारसं परिचित नव्हतं. मी निराश झालो. एका आधुनिक श्रेष्ठ कथालेखकाचं नावही सुशिक्षितांच्या, अभ्यासकांच्या कानापर्यंत पोहोचलं नाही या कर्माला काय म्हणावं ?

एक गोष्ट मात्र खरी, की उत्तम साहित्यकृती आपल्या जन्मभर भावनिक सोबत करतात. मनाला धीर देतात. जीर्ण होत चालेल्या जीवनशक्तीला चैतन्यानं न्हाऊ घालतात. मनातल्या अंधाराला उजेडाची स्वप्नं दाखवतात.

**कृती २) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) खालील कृती लिहा**

**'जन्माला अत्तर घालत म्हणजे'.** १

पर्याय य) दुसऱ्याला आनंद देत.

र) दुसऱ्याला उत्साहीत करत

ल) स्वसमर्पणातून दुसऱ्याला आनंद देत.

**२) कृती लिहा काय ते लिहा** ३

य) डोळ्यांत असणारे ⟶ [ ]

र) सावळा असलेला ⟶ [ ]

ल) खडकावर बसलेले ⟶ [ ]

झाडांच्या मनता जाऊ, पानांचे विचार होऊ
पोपटी स्पंदनासाठी, कोकीळ होऊनी गाऊ...

बहरात वसंतामधल्या, तो सुर सावळा ऐकत
जातील फुलेही रंगून, जन्माला अत्तर घालत
चल सुराबरोबर आपण, तो फाया कानी ठेवू....



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan

खेळून रंगपंचमी, फुलापाखरे भिजली सारी
हा थवा असे रंगती की पताकाच फिरणारी
हे भिरभिरणारे तोरण दाराला आणून लावू...

ही कोणाची रे करणी डोळ्यांत झऱ्याचे पाणी
हे उधाण आनंदाचे की देवाघरी गाणी
गाण्यात ऋतूच्या आपण चाल खळाळून रे वाहू.....

पाण्यात उतरुनी माझे, मन खडकावर बसताना.
थुई थुई नाचरे पाणी, मज दिसते रे हसताना
एक रोप तुषाराचे मज, मायेने घाली न्हाऊ....

ओंजळीमध्ये मी अलगद, आकाश जरासे धरता
आकाशाने मी अवघ्या पाण्याची ओटी भरता
हातात ऊन डुचमळते नि सूर्य लागतो पोहू....

हे फशंदवरले पक्षी की हंगामांचे साक्षी
झाडांच्या पायी काढी, सावली उन्हावर नक्षी
मग तिलाच फुटले पंख, नि त्यांचे झाले काऊ....

मानवी स्पर्श ना जेथे, असतील फुले–पाखरे
रानात अशा तू मजला, ईश्वरा जरा टाक रे
मी झाड होऊनी तेथे, पसरीन आपुले बाहू....

(हिरवं भान)

**स्वमत / अभिव्यक्ती**

**'तुम्ही झाडांच्या मनात शिरला आहात'**

**अशी कल्पना करुन ते कल्पनाचित्र शब्दबद्ध करा.** ४

## विभाग ३ - साहित्यप्रकार (नाटक)

**कृती ३ अ) सूचनेनुसार कृती करा.** ४

१) हेरंबकरांच्या नाटक मंडळीचे नाव ⟶ [ ] १



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Prafull from Ahmednagar, Thanks Prafull.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

२) नाटकांचे तीन प्रकार ⟶ | १) २) ३) | १

३) बालगंधर्वांचे नाव ⟶ |  | १

४) प्रयोक्षम साहित्य प्रकार म्हणजे ⟶ |  | १

पर्याय अ) नाटक, कथा ब) नाटक, एकांकिका क) नाटक काव्य

**ब) पुढील कृती लिहा.** ४

'पायधूळ झाडा. त्याशिवाय मी तुमचे पाय. खोडणार नाही:

या वाक्यातील लक्ष्यार्थ स्पष्ट करा.

## विभाग - ४ उपयोजित

**कृती ४ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** १०

१) उत्तम सूत्र संचालनासाठी आवश्यक असलेली कौशल्ये स्पष्ट करा.

२) सूत्र संचालकाने व्यस्थित पूर्वतयारी केली तरच सुत्रसंचालन उत्तम होऊ शकते. या विधाची सत्यत पटवून द्या.

३) 'वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप' या विषयावर कार्यक्रम पत्रिका तयार करा.

## विभाग - ५ व्याकरण

**कृती५ खालील कृती सूचनांनुसार सोडवा** १२

१) मुळ शब्दशक्ती ................ आहे. १

पर्याय अ) एक ब) दोन क) तीन

२) 'आपल्याभोवती वावरणाऱ्या कोल्ह्यांपासून दूरच राहावे' या वाक्यातील 'कोल्हा' या शब्दातून व्यक्त होणारा लक्षार्थ ............ १

पर्याय अ) जंगलातील धूर्त प्राणी

ब) मळ्यातील मका खाणारा

क) धूर्त माणसे.



8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi